# भारतातील राष्ट्रीय कृषी विमा योजनेची प्रगती एक अभ्यास

**भोकरे मनोहर अशोकराव**
संशोधक विद्यार्थी

**डॉ.शिंदे संजय बाळु**
सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग,
श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा

प्रस्तावना :

कृषी क्षेत्र हा अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. अन्नधान्य, रोजगार याबरोबरच उद्योग आणि सेवा क्षेत्राच्या विकासाला प्रभावित करणारा घटक म्हणून कृषी क्षेत्राकडे पाहिले जाते, अनेक विकसित देशांचा इतिहास हेच सांगतो की, ज्या देशाचा कृषी क्षेत्राचा पाया भक्कम आहे त्याच देशांनी उद्योग व सेवा क्षेत्रात प्रगती केल्याचे दिसते, मात्र असे असतांनाही भारतीय शेती ही मान्सूनवर अवलंबून असल्यामुळे शेती क्षेत्रात नेहमीच चढ-उतार दिसून येतात. पीक उत्पादनात अनिश्चितता असते; ही अनिश्चितता लक्षात घेऊन शासनाने शेतकऱ्यांसाठी पीक विमा कवच उपलब्ध करून दिले आहे. राष्ट्रीय कृषी विमा योजनेच्या माध्यमातून ज्यावेळेस नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होते., त्यावेळी पिक विमा योजनेतून नुकसान भरपाई दिली जाते.

शेती क्षेत्राला आणखी भेडसावणारी समस्या म्हणजे हवामानातील बदल आहे. अलिकडील काळात हवामानात मोठ्या प्रमाणात बदल होत आहे. हवामान बदलामुळे शेती उत्पादनात अनिश्चितता निर्माण होतात. हवामान बदलामुळे पिकांवर अनेक वेळा रोग प्रादुर्भाव होतो. त्यामुळे दर्जेदार, गुणवत्तापूर्ण उत्पादन होत नाही व उत्पादनात घट होते.

थोडक्यात, देशातील शेती ही प्रामुख्याने निसर्गावर अवलंबून आहे. अवर्षण प्रवण क्षेत्राची मोठी व्याप्ती, हलक्या व अवनत जमीनीचे मोठे प्रमाण, विषम, अनिश्चित व खंडित पर्जन्यमान, मर्यादित सिंचन सुविधा, शेती आदानांचा अतिवापर, अल्प उत्पादकता, महाग आदाने, भांडवलाची कमतरता, शेतीमाल किंमतीतील चढ उतार, हवामानातील बदल यासारख्या समस्यामुळे भारतातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती हलाखीची झाली आहे. या सर्व परिस्थितीत शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासन विविध प्रकारच्या योजना व कार्यक्रमाची अमंलबजावणी करत आहे. त्याचाच एक भाग केंद्रपुरस्कृत राष्ट्रीय कृषी विमा योजना होय. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. ते नुकसान भरून देण्याची तरतूद या योजनेत करण्यात आली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील प्रमाणे उद्दिष्टे निर्धारित करण्यात आली आहेत.

१. राष्ट्रीय कृषी विमा योजनेतील सहभागी शेतकरी संख्या यांचा अभ्यास करणे.

२. राष्ट्रीय कृषी विमा योजनेतील विमा संरक्षित रक्कम अभ्यासणे.

३. राष्ट्रीय कृषी विमा योजनेच्या सहभागी शेतकऱ्यांशी लाभार्थी शेतकऱ्यांचे प्रमाण तपासणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी आधार सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. दुय्यम आधार सामग्री संकलित करण्यासाठी शासकीय कार्यालय, कृषी आयुक्तालय, कृषी मंत्रालय अशा विविध कार्यालयाचा आधार घेण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे विविध विभागातील वित्तीय लेखे, वार्षिक अहवाल, विवरण पत्रे, दस्ताऐवज इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

**भारतातील राष्ट्रीय कृषी विमा योजनेची प्रगती**

तक्ता क्र. १.१ - भारतातील राष्ट्रीय कृषी विमा योजनेची प्रगती

| अ. क्र. | हंगाम वर्ष | सहभागी शेतकरी संख्या (दशलक्ष) | संरक्षित क्षेत्र (दशलक्ष) | विमा संरक्षित रक्कम (कोटी रु.) | विमा हप्ता (कोटी रु.) | नुकसान भरपाई (कोटी रु.) | लाभार्थी शेतकरी (दशलक्ष) | सहभागी शेतकऱ्यांशी लाभार्थी शेतकऱ्यांचे प्रमाण (%) | विमा संरक्षित रक्कमेशी नुकसान भरपाईचे प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 1999-00 | 0.58 | 0.78 | 365.41 | 5.42 | 7.69 | 0 | 0.00 | 2.10 |
| 2. | 2000-01 | 10.5 | 16.33 | 8506.07 | 234.52 | 1281.97 | 4.16 | 39.62 | 15.07 |
| 3. | 2001-02 | 10.65 | 16.03 | 8999.97 | 291.77 | 558.29 | 2.19 | 20.56 | 6.20 |
| 4. | 2002-03 | 12.09 | 19.57 | 11269.24 | 363.97 | 2012.94 | 5.22 | 43.18 | 17.86 |
| 5. | 2003-04 | 12.39 | 18.82 | 11163.62 | 347.39 | 1149.79 | 3.81 | 30.75 | 10.30 |
| 6. | 2004-05 | 16.22 | 29.62 | 16944.82 | 534.80 | 1198.92 | 3.45 | 21.27 | 7.08 |
| 7. | 2005-06 | 16.72 | 27.75 | 18590.76 | 554.77 | 1424.75 | 3.67 | 21.95 | 7.66 |
| 8. | 2006-07 | 17.91 | 27.30 | 21301.58 | 610.17 | 2292.19 | 4.52 | 25.24 | 10.76 |
| 9. | 2007-08 | 18.44 | 28.14 | 24474.61 | 683.03 | 1725.54 | 3.17 | 17.19 | 7.05 |
| 10. | 2008-09 | 19.20 | 26.49 | 26814.78 | 807.66 | 3887.62 | 6.20 | 32.29 | 14.50 |
| 11. | 2009-10 | 23.93 | 33.67 | 38624.21 | 1154.55 | 5118.11 | 9.01 | 37.65 | 13.25 |
| 12. | 2010-11 | 17.65 | 24.05 | 34721.45 | 1019.95 | 2299.71 | 3.39 | 19.21 | 6.62 |
| 13. | 2011-12 | 16.79 | 23.38 | 34771.04 | 972.03 | 2208.99 | 3.13 | 18.64 | 6.35 |
| 14. | 2012-13 | 16.79 | 24.38 | 42909.15 | 1326.35 | 5016.24 | 4.47 | 26.62 | 11.69 |
| 15. | 2013-14 | 13.72 | 20.71 | 41554.15 | 1275.19 | 4323.62 | 3.80 | 27.70 | 10.40 |
| 16. | 2014-15 | 16.74 | 20.77 | 45880.82 | 1398.10 | 4288.02 | 6.41 | 38.29 | 9.35 |
| 17. | 2015-16 | 30.91 | 33.90 | 80622.09 | 2537.24 | 17552.79 | 18.37 | 59.43 | 21.78 |
| 18. | 2016-17 | 58.37 | 56.11 | 203110 | 4078.00 | 16809.00 | 15.65 | 26.81 | 8.28 |
| 19. | 2017-18 | 53.27 | 50.77 | 202282 | 4204.00 | 22118.00 | 17.68 | 33.19 | 10.93 |
| 20. | 2018-19 | 57.72 | 52.58 | 229598 | 4773.00 | 28129.00 | 22.26 | 38.57 | 12.25 |
| 21. | 2019-20 | 61.29 | 50.10 | 219040 | 4502.00 | 25822.00 | 22.36 | 36.48 | 11.79 |
| एकूण | | 501.88 | 601.25 | 1321544.77 | 31673.91 | 149230.18 | 162.92 | 32.46 | 11.29 |

निष्कर्ष

भारतात राष्ट्रीय कृषी विमा योजनेअंतर्गत १९९९-२००० ते २०१९-२० या कालावधीत सहभागी शेतकरी संख्येत वाढ झाली आहे. सन १९९९-२००० मध्ये सहभागी शेतकरी ०.५८ दशलक्ष एवढे असून यामध्ये वाढ होऊन २०१९-२० मध्ये ६१.२९ दशलक्ष एवढे झाले आहे. यामध्ये सर्वाधिक सहभागी शेतकरी १९९९-२००० मध्ये ६१.२९ दशलक्ष एवढे असून सर्वात कमी १९९९-२००० मध्ये ०.५८ दशलक्ष एवढे असल्याचे दिसून येते.

भारतात विमा संरक्षित क्षेत्राच्या वर्षनिहाय प्रवृत्तीवरून असे दिसून येते की, सन १९९९-२००० ते २०१९-२० या कालावधीत एकूण विमा संरक्षित क्षेत्र ६०१.२५ दशलक्ष हेक्टर इतके आहे. सन १९९९-२००० मध्ये विमा संरक्षित क्षेत्र ०.७८ दशलक्ष हेक्टर इतके असून यात वाढ होऊन २०१९-२० मध्ये ५०.१० दशलक्ष हेक्टर इतके झाले. यामध्ये सर्वाधिक विमा संरक्षित क्षेत्र २०१६-१७ मध्ये ५६.११ दशलक्ष हेक्टर एवढे असून सर्वात कमी १९९९-२००० मध्ये ०.७८ दशलक्ष हेक्टर एवढे असल्याचे दिसून येते.

भारतातील राष्ट्रीय कृषी विमा योजनेअंतर्गत विमा संरक्षित रक्कमेवरून असे दिसून येते की, सन १९९९-२००० ते २०१९-२० या कालखंडात एकूण विमा संरक्षित रक्कम रूपये १३,२१,५४४.७७ कोटी इतकी आहे. सन १९९९-२००० मध्ये विमा संरक्षित रक्कम रूपये ३६५.४१ कोटी इतकी असून त्यात वाढ होऊन २०१९-२० मध्ये रूपये २,१९,०४०कोटी इतकी झाली आहे.

राष्ट्रीय कृषी विमा योजना अंतर्गत भारतात विमा हप्ता प्रवृत्तीवरून असे दिसून आले की, सन १९९९-२००० ते २०१९-२० या कालखंडात शेतकऱ्यांनी भरलेला एकूण विमा हप्ता रूपये ३१,६७३.९१ कोटी इतका आहे. सन १९९९-२००० मध्ये विमा हप्ता रूपये ५.४२ कोटी इतका असून त्यात वाढ होऊन २०१९-२० मध्ये रूपये ४५०२ कोटी इतका झाला आहे. यामध्ये सर्वाधिक विमा हप्ता २०१८-१९ मध्ये रूपये ४७७३ कोटी इतका असून सर्वात कमी १९९९-२००० मध्ये रूपये ५.४२ कोटी इतका असल्याचे दिसून येते.

सन १९९९-२००० ते २०१९-२० या कालखंडात सहभागी शेतकऱ्यांना प्राप्त नुकसान भरपाईवरून असे दिसून येते की, भारतात एकूण प्राप्त नुकसान भरपाई रूपये १,४९,२३०.१८ कोटी इतकी दिसून आली. सन १९९९-२००० मध्ये नुकसान भरपाई रूपये ७.६९ कोटी एवढी असून त्यात वाढ होऊन २०१९-२० मध्ये रूपये २५,८२२ कोटी इतकी झाली आहे. यामध्ये सर्वाधिक नुकसान भरपाई २०१८-१९ मध्ये रूपये २८,१२९ कोटी इतकी असून सर्वात कमी १९९९-२००० मध्ये रूपये ७.६९ कोटी इतकी असल्याचे दिसून येते. सदरील कालखंडात विमा संरक्षित रक्कमेच्या तुलनेत मिळालेल्या नुकसान भरपाईचे प्रमाण ११.२९ टक्के एवढे दिसून आले आहे.

राष्ट्रीय कृषी विमा योजनेत लाभार्थी शेतकरी संख्येवरून असे दिसून येते की, भारतात सदरील कालखंडात एकूण लाभार्थी शेतकरी १६२.९२ दशलक्ष एवढे असल्याचे दिसून आले. त्यापैकी सर्वाधिक २०१९-२० मध्ये लाभार्थी शेतकरी २२.३६ दशलक्ष एवढे असून सर्वात कमी १९९९-२००० मध्ये लाभार्थी शेतकरी शून्य असल्याचे दिसून आले. भारतात १९९९-२००० ते २०१९-२० या कालखंडात सहभागी शेतकऱ्यांशी लाभार्थी शेतकऱ्यांचे प्रमाण ३२.४६ टक्के एवढे दिसून आले.

**शिफारशी :**

1) कर्जदार शेतकऱ्यांना योजनेतील सहभाग अनिवार्य आहे. तर बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक स्वरूपाचा आहे. शेती उत्पादनातील अनिश्चितता टाळणे व योजनेतील शेतकरी सहभाग वाढविण्यासाठी सर्व शेतकऱ्यांना राष्ट्रीय कृषी विमा योजना सक्तीची करावी.

२) राष्ट्रीय कृषी विमा योजनेत केवळ नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीपासून विमा संरक्षण मिळते. भारनियमन, वीज पुरवठयातील खंड व शेतीमाल भावातील घसरण यामुळे देखील नुकसान होते. या जोखीमेचा योजनेत समावेश करण्यात यावा.

३) राष्ट्रीय कृषी विमा योजना अंतर्गत ज्या पिकांचा पेरा कमी आहे अशा पिकांना मोठया प्रमाणात नुकसान भरपाई देण्यात येते. यामुळे प्रमुख पिकांना नुकसान भरपाई मिळत नाही. विमा कंपन्याच्या या बाबीकडे शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे.

४) बँका शेतकऱ्यांना पीक कर्ज देतांना विमा हप्ता कर्जातून कापून घेतात. मात्र विमा हप्ता रक्कम व्याजासाठी गृहीत धरण्यात येवू नये.

५) राष्ट्रीय कृषी विमा योजनेअंतर्गत विमा संरक्षित रक्कम नेहमी अधिक असून मिळणारी नुकसान भरपाई कमी दिसून आली आहे. विमा कंपन्यानी नुकसान काळात शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या नुकसान भरपाईमध्ये वाढ करण्यात यावी. यामुळे कमाल शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळेल.

६) शेतकऱ्यांना विमा संरक्षण देतांना ठरविण्यात आलेली विमा संरक्षित रक्कम खूप कमी आहे. या विमा संरक्षित रक्कमेत उत्पादन खर्च व बाजार किंमतीचा विचार करून वाढ करावी.

७) राष्ट्रीय कृषी विमा योजनेत शेतकऱ्यांना दिली जाणारी नुकसान भरपाई ठरवितांना शेतमालाचा उत्पादन खर्च व उत्पादकता याचा विचार करावा.

८) राष्ट्रीय कृषी विमा योजनेत पीक कापणीपर्यंत नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण मिळते. मात्र अवेळी पडणारा पाऊस व चक्रीवादळ यामुळे पीक कापणीनंतर मळणी करतांना, पोते भरतांना, शेतात पसरवून ठेवलेला माल, शेतमाल वाहतूक करतांना पिकांचे नुकसान होते. अशा विमा उतरविलेल्या पिकांचे नुकसान झाल्यास त्याचे वैयक्तीक पातळीवर पंचनामे करून शेतकऱ्यास नुकसान भरपाई देण्यात यावी. ही नुकसान भरपाई एकूण नुकसानीच्या किमान 50 टक्के असावी.

**संदर्भ सूची :**


| | | | |
|---|---|---|---|
| १. | सिंह रमेश कुमार | : | कृषी का उद्भव और विकास, कुरुक्षेत्र मासिक, वर्ष ५३, अंक १०, ऑगस्ट २००७, |
| २. | मिनिस्ट्री ऑफ ॲग्रीकल्चर अँड वेल्फेअर | : | ॲग्रीकल्चरल स्टॅटिस्टिक्स ॲट ए ग्लान्स २०१८, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, जानेवारी २०१९, |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | कविमंडन विजय | : | कृषी अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९६, |
| ४. | कायंदे गंगाधर वि. | : | शेतीचे अर्थशास्त्र : सिद्धांत आणि धोरणे, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक, २००७, |
| ५. | शुल्टझ थिओडोर | : | ॲग्रीकल्चर इन ॲन अनस्टेबल इकॉनॉमी, मॅकग्रॉव्हहिल बुक कंपनी, न्यूयार्क, १९४५, पृष्ठ क्र. ११-१२ |
| ६. | मिश्रा जे. पी. | : | कृषी अर्थशास्त्र, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आग्रा, २००८ |
| ७. | पाटील लीला | : | कृषी अर्थशास्त्राची मुलतत्त्वे, प्रकाशक विलास अंधारे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८६, |
| ८. | त्रिपाठी बद्री बिशाल | : | भारतीय कृषी, किताब महल, इलाहाबाद, २००८, |
| ९. | नितीन चैधरी | : | भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राचे योगदान, योजना मासिक, वर्ष ४१, अंक ९, एप्रिल २०१४, |
| १०. | पठारे उत्तम | : | कल्याणकारी अर्थतज्ज्ञ, पुण्यनगरी, अंक १०, जुलै २०१६, |
| ११. | मेटे नंदकुमार विश्वनाथ | : | भारतीय मान्सूनचे स्वरूप व महत्त्व, योजना मासिक, जुलै २०१२, |
| १२. | राधाकांत भारती | : | भारतीय कृषि का मूलाधार : मान्सून पवन, योजना मासिक, वर्ष ४८, अंक ४, जुलै २००४ |
| १३. | कुलकर्णी सर्वोत्तम, भामरे दिपक | : | महाराष्ट्रातील जलसंपत्ती, योजना मासिक, वर्ष २५, अंक ७, फेब्रुवारी १९९८ |


******